नियमीत दिवाणी दावा क्र.७८/२०२४
(नम्रता विरुध्द सुरेश वगैरे)
(CNR No.MHSN120005772024)

**निशाणी क्र.१९ खालील आदेश**
**(दिनांक २०.११.२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी नि.क्र.१५ कडील सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे दिलेल्या अर्जास त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल न केल्याने वादी यांचेविरोधात विना म्हणणेचा आदेश दि.१९.०४.२०२५ रोजी पारीत करण्यात आला तो आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी या महिला असून प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी दिलेल्या अर्जास मुदतीत म्हणणे द्यावे लागते याचे ज्ञान त्यांना नव्हते. तसेच, सदर कामाबाबतची सर्व त्या कागदपत्रांची पुर्तता वेळेत न झाल्याने कागदपत्रे वकीलांकडे सुपुर्त करता न आल्याने त्यांना मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. अशा परिस्थितीत त्यांचेविरुध्द विना म्हणणेचा आदेश पारीत केलेला आहे. सबब, प्रस्तुत वादीविरुध्द पारीत झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक होणार आहे. प्रस्तुत कामी वादीचे म्हणणे दाखल करुन घेतलेने अंतिम न्यायनिर्णय गुणदोषावरती होणेस मदतच होणार आहे. वादीचे म्हणणे दाखल न करुन घेतलेस त्यांचे कायमस्वरुपी अपरिमीत व पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट सदरचे म्हणणे दाखल करुन घेतलेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. म्हणून वादी यांचेविरुध्द विना म्हणणेचा झालेला आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे दाखल करुन घेणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादीच्या नि.क्र.१९ कडील अर्जास

नि.क्र.२१ कडे त्यांचे म्हणणे देवून त्यांना वादीच्या अर्जातील कथने मान्य नसून वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा असे सांगितले आहे.

**३.** वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे, दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरोधात वाटपाचा, डिक्लेरेशनचा व निरंतर ताकीदीकरिता दाखल केला आहे. वादी महिला असून प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी दिलेल्या अर्जास मुदतीत म्हणणे द्यावे लागते याचे ज्ञान त्यांना नव्हते. तसेच, सदर कामाबाबतची सर्व त्या कागदपत्रांची पुर्तता वेळेत न झाल्याने कागदपत्रे वकीलांकडे सुपुर्त करता न आल्याने मुदतीत म्हणणे दाखल करता न आल्याने त्यांचेविरुध्द विना म्हणणेचा आदेश पारीत केलेला आहे. अर्जातील नमुद कारणे संयुक्तिक नसले तरीही वादीस प्रस्तुत प्रकरणात त्यांचे म्हणणे पटलावर सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे करीत आहे.

## आदेश

१. वादी यांचा निशाणी क्र.१९ कडील अर्ज र.रु.३००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे व त्यांचेविरुध्द झालेला विना म्हणणेचा आदेश दुर सारणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देण्यात यावे.

दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

sd/-

पलूस.
(एम.ए.एम.जे. शेख)

दिनांक- २०.११.२०२५
दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पलूस.